महाराष्ट्र शासन
# तंत्र शिक्षण विभागीय कार्यालय, पुणे
दूरध्वनी क्र.०२०-२५६५६२३४/२५६५७१७६
Email ID : ropune@dtemaharashtra.gov.in
४१२-ई, शिवाजीनगर, पुणे - ४११ ०१६.

जावक क्रमांकः तंशिविकापु/विवि/सीओईपी वर्कशॉप/२०२२-२३/ ४६०७ दिनांक : ०३.१०.२०२२. 03 OCT 2022

**परिपत्रकः**

प्रति,
प्राचार्य / संचालक,
तंत्रशिक्षण संचालनालयाच्या अखत्यारीतील पुणे विभाग अंतर्गत,
सर्व शासकीय / अशासकीय अनुदानित / खाजगी विनाअनुदानित
पदवी व पदविका **अभियांत्रिकी अभ्यासक्रमाच्या** संस्था.

**विषय : प्राचार्यांची एकदिवसीय कार्यशाळा - तंत्रशिक्षणाची गुणवत्ता सुधार दिनांक ०६.१०.२०२२..**

या विभागीय कार्यालयाच्या अंतगर्त येणा-या सर्व शासकीय, अशासकीय अनुदानित व खाजगी विनाअनुदानित पदवी व पदविका अभियांत्रिकी अभ्यासक्रम राबविणा-या संस्थांचे प्राचार्य / संचालक यांचेकरिता दिनांक ०६.१०.२०२२ रोजी एकदिवसीय कार्यशाळा - तंत्रशिक्षणाची गुणवत्ता सुधार आयोजित करण्यात आलेली आहे. सदर कार्यशाळेचे उद्घाटन **श्री. विकास चंद्र रस्तोगी,** प्रधान सचिव, उच्च व तंत्रशिक्षण विभाग, महाराष्ट्र शासन यांचे हस्ते होणार आहे. **डॉ. अभय वाघ,** संचालक, तंत्रशिक्षण संचालनालय, म.रा., मुंबई हे या कार्यशाळेस मार्गदर्शन करणार आहेत.

सदर कार्यशाळेचा समारोप **मा. ना. श्री. चंद्रकांतदादा पाटील,** मंत्री - उच्च व तंत्रशिक्षण महाराष्ट्र राज्य यांचे हस्ते होणार आहे.

सदर कार्यशाळेकरिता सर्व पदवी व पदविका अभियांत्रिकी अभ्यासक्रमाच्या संस्थांच्या प्राचार्य / संचालक यांची उपस्थिती अनिवार्य असून कोणीही प्रतिनिधी पाठवू नये.

सदर कार्यशाळेची नोंदणी प्रक्रिया सुलभ होण्यासाठी, प्राचार्यांनी स्वतः त्यांचा तपशिल सोबत दिलेल्या गुगल फॉर्ममध्ये दिनांक ०४.१०.२०२२ (सायं ४.०० वाजेपर्यंत) अद्ययावत करावा. तदनंतर गुगल फॉर्मची लिंक बंद करण्यात येईल.

कार्यक्रमाचे स्वरुप : एकदिवसीय कार्यशाळा - तंत्रशिक्षणाची गुणवत्ता सुधार.
कार्यक्रमाचे ठिकाण : **COEP Technological University** (पूर्वीचे अभियांत्रिकी महाविद्यालय,पुणे)
कार्यक्रमाची दिनांक व वेळ : ०६.१०.२०२२ (सकाळी १०.०० ते सायंकाळी ६.००)

(डॉ. द. व्यं. जाधव)
सहसंचालक,
तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, पुणे १६.

प्रत : १) मा. संचालक, तंत्रशिक्षण संचालनालय, म.रा., मुंबई (कार्यासन क्रमांक १)
२) प्रोग्रॅमर, तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, पुणे यांना संकेतस्थळावर प्रसिध्द करणेकरिता व सदर कार्यक्रमाची गुगल फॉर्मची लिंक तयार करुन सदर परिपत्रकासोबत द्यावी..